नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०९/२०२४ (शनिवार) सकाळ

## पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण पोलीस भवन येथील श्री. गणपतीला निरोप

पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण, पोलीस भवन येथे नागपूर ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने गणपतीची स्थापना करण्यात आली होती. आज रोजी दि. २१/०९/२०२४ रोजी गणपती विसर्जन निमीत्ताने मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांच्या हस्ते गणपतीची आरती झाली. तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण येथे मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. रमेश धुमाळ, सर्व शाखा प्रमुख, पोलीस अंमलदार आणि कार्यालयीन कर्मचारी वर्ग उपस्थित होते.



<u>**जबरी चोरीचा आरोपी अटक**</u>

पोस्टे भिवापूर अंतर्गत बस स्टॉप भिवापुर येथे दि. १९/०९/२०२४ रोजीचे २३/१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रमोद उत्तमराव मोटघरे, वय २४ वर्ष रा. इंदीरा नगर आंभोरा रोड भिवापुर जि. नागपुर याने आपला पानठेला दिनांक १९/०९/२०२४ चे २३/१५ वा दरम्यान दुकान बंद करून चहाचे भांडे धुत असता तेव्हा फियादीचा भाऊ हा सुध्दा दुकानाजवळ उभा होता काही वेळात नमुद **आरोपी नामे— अक्षय रामटेके, वय ३० वर्ष रा. भिवापुर जि नागपुर** हा पानठेल्याजवळ आला व त्याने फिर्यादीला इकडे ये मला सिगरेट दे असे म्हटले तेव्हा फिर्यादी त्याला सिगरेटचे पैसे लागतील असे म्हटले असता त्याने तु कसे काय सिगरेटचे पैसे मागतो असे म्हणुन फिर्यादीचे पानठेल्यातील सामान फेकफाक करत होता तेव्हा फिर्यादीने त्याला अडवले असता त्याने फिर्यादीला शिवीगाळ केली व धमकी दिली. आरोपीने फिर्यादीच्या पानठेल्यामध्ये ठेवलेले पैसे अंदाजे ५०००/— रू वर असलेले जबरदस्तीने काढुन आरोपी पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे भिवापूर येथे आरोपीविरूद्ध कलम ३०९(४) भारतीय न्याय संहीता २०२३ अन्वये गुन्हा नोंद केला असुन भिवापूर पोलीसांनी तात्काळ सदर गुन्हयाची दखल घेत डीबी पथकाने गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहिती द्वारे सदर गुन्हयातील आरोपीला दि. २०/०९/२०२४ रोजी अटक केली आहे. गुन्हयाचा तपास सफौ अजितसिंह ठाकुर हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे भिवापूर ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल तसेच पोस्टे भिवापूर येथील डी.बी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**